| | |
|---|---|
| **महाराष्ट्र शासन**<br>**ग्रामीण रुग्णालय, गुहागर, जि. रत्नागिरी.** | |
| **कार्यालय दूरध्वनी क्र. – ०२३५९ २४०२०८** | **शिवाजी चौक, गुहागर.**<br>**ई-मेल – guhagarrh240208@gmail.com** |
| **आरोग्य सेवा** | **जा.क्र.ग्रारुगु/आस्था/आरबीएसके /वाहन/ जाहिरात/ 422 /२०२६.**<br>**दिनांक- १७.०६.२०२६** |

**ग्रामीण रुग्णालय गुहागर, ता. गुहागर जि. रत्नागिरी.**
**राष्ट्रीय बालस्वास्थ्य कार्यक्रम**

## दुसरी जाहिर नोटिस

**वाहन भाडे तत्वावर घेणे साठी दर पत्रक मिळण्याबाबत**

राष्ट्रीय आरोग्य अभियान राष्ट्रीय बालस्वास्थ्य कार्यक्रम अंतर्गत ग्रामीण रुग्णालय गुहागर आस्थापनेवरील आर बी एस के वैद्यकिय पथकांना ० ते १८ वयोगटातील अंगणवाडी व शाळा स्तरावरील मुलांची आरोग्य तपासणी करीता वाहन भाडे पध्दतीने घेणेसाठी वाहन मक्तेदाराकडून २ सिलबंद लखोटयामध्ये दरपत्रके मागविणेत येत आहेत. **लखोटा क्र.१ मध्ये खालील नमूद केलेली अटी-शर्तीनुसार आवश्यक कागदपत्रे व लखोटा क्र.२ मध्ये फक्त दरपत्रक इ. सिलबंद स्वरुपात कार्यालयामध्ये जमा करावेत.**

**दर पत्रकाच्या अटी व शर्ती खालील प्रमाणेः-**

१) दर पत्रक विहीत नमुन्यात व मुदतीत या कार्यालयाकडे पोहचविणे आवश्यक आहे.
२) उशिरा प्राप्त झालेले दरपत्रक स्वीकारले जाणार नाही.
३) सिलबंद लखोटयावर राष्ट्रीय आरोग्य अभियान राष्ट्रीय बालस्वास्थ्य कार्यक्रम ग्रामीण रुग्णालय गुहागर स्तरावरील आरबीएसके वैद्यकिय पथकांसाठी वाहन भाडे तत्वावर पुरविण्यासाठी दरपत्रक असा उल्लेख करावा.
४) वाहनाचे इंधन, वंगण दुरुस्ती व वाहन चालकाचा खर्च (वेतन भत्ते, प्रवास भत्ते) इ. सह दर पत्रक सादर करावे.
५) सदर वाहन हजर तारखे पासून ते उपसंचालक स्तरावरुन वाहनांची प्रक्रिया पुर्ण होई पर्यत ग्राहय राहील.
६) वाहन सेवा ही २४ X ७ कालावधीसाठी वाहन चालकासह वैद्यकिय पथकासाठी उपलब्ध असावी. त्यासाठी चालकाला कुठलाही अतिरिक्त भत्ता दिला जाणार नाही.
७) वाहनाची मर्यादित धाव ० ते १५०० कि.मी. प्रतिमहा या मर्यादेत निश्चित करणेत आली आहे.
८) शासकिय वापराकरीता वाहनाची दरमहा धाव १५०० कि.मी. चे अधीन राहून देयक अदा

करणेत येईल. वाहनाचे धाव १५०० कि.मी. पेक्षा कमी झाल्यास १५०० कि.मी. चे देयक अदा करणेत येईल.

९) वाहनधारकाचे वाहन मंजुरी नंतर कार्यारंभ आदेशाच्या ३ टक्के रक्कम अनामत रक्कम म्हणून ग्रामीण रुग्णालय गुहागर स्तरावरील वैद्यकिय अधिक्षक यांचे खाते वर भरणाकरणे बंधनकारक राहील. तसेच रु.१००/- चे करार पत्रकावर लिहून देणे बंधनकारक असेल.

१०) आरबीएसके अंतर्गत तात्पुरत्या स्वरुपात घेण्यात येणारी सर्व **T-Permit** वाहने ही फक्त आरबीएसके कार्यक्रमासाठीच वापरण्यात यावीत. ही सर्व वाहने ४+१ सीट असलेली बंद बॉडी या तत्सम स्वरुपातील व इंजिन कॅपॅसिटी १००० सीसीच्या वर असणे आवश्यक आहे. सर्व वाहने मागील ८ वर्षे कालावधी पेक्षा जुनी नसणे बंधनकारक राहील.
**आरबीएसके कार्यक्रमासाठी वापरण्यात येणारे वाहन हे नोंदणीकृत T-Permit असणे आवश्यक आहे.** RTO कडील सर्व परवाने व गाडिचा पुर्ण विमा भरलेला असणे आवश्यक आहे.

११) वाहनाचा वापर डोंगराळ व अतिदुर्गम भागात केला जाईल.

१२) किरकोळ अथवा कोणत्याही स्वरुपाची दुरुस्ती व देखभाल करणे हे ही वाहन धारकाची जबाबदारी राहील.

१३) कराराच्या दरम्यानच्या काळात वाहनांच्या भागांची टायर, लूब्री कंट्स, डिझेल आदीच्या किंमतीत वाढ झाल्यास कुठल्याही प्रकारे दर वाढविले जाणार नाही / तशी मागणी करता येणार नाही. याबाबत अंतिम निर्णय जिल्हा शल्यचिकित्सक यांचे राहतील.

१४) आरबीएसके अंतर्गत वाहनांची राष्ट्रीय बालस्वास्थ्य कार्यक्रमा व्यतिरिक्त खाजगी कामासाठी गैरवापर झाल्याचे निदर्शनास आल्यास योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

१५) दिलेल्या मार्गदर्शक सुचने प्रमाण वाहन उपलब्ध झाल्यास सदर वाहन सेवा अभियंता, जिल्हा कार्यशाळा रत्नागिरी यांचे कडून तपासणी करुन घेण्यात यावीत.

१५) सेवा अभियंता जिल्हा कार्यशाळा रत्नागिरी यांचे कडून वाहन योग्य असले बाबतचा अहवाल प्राप्त झाल्या नंतर वाहन रुजु करुन घेण्यासाठी आदेश देण्यात येतील.

१६) वाहन रुजु करुन घेतल्या नंतर वाहनाची सर्व कागदपत्रे (आरसी, इंन्श्युरन्स, पीयुसी, टॅक्स भरणा पावती, फिटनेस इ..), वाहन हजर झालेचा हजर अहवाल व सेवा अभियंता यांचे कडील प्राप्त अहवाल या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

१७) वाहन चालकाचे वाहन चालविण्याचे ड्रायव्हिंग लायसन्स असणे बंधनकारक राहील.

१८) वाहन उपलब्ध नसेलत्या कालावधीमध्ये दुस-या वाहनाची व वाहन चालकाची पर्यायी व्यवस्था करणे बंधनकारक राहील. ती न केल्यास पर्यायी व्यवस्थेसाठी जो खर्च केला जाईल तो देयकातून अथवा सुरक्षा अनामतीमधून वसूल करण्यात येईल. कोणत्याही कारणामुळे वाहन उपलब्ध करुन न दिल्यास पहिला १ तास वगळता पुढील प्रत्येक तासासाठी किंवा तासाच्या भागासाठी रु.५०/- (र.रु.पन्नास मात्र) इतकी देय कर रक्कमेतून वजा केली जाईल अथवा वसूली केली जाईल. याबाबत सर्व अधिकार वैद्यकिय अधिक्षक ग्रामीण गुहागर रुग्णालय सर्व यांचे राहतील.

१९) देयक सादर करताना लॉगबुक पडताळणी करीता सादर करावे. वाहन फिरती केलेल्या वाहनाचे लॉगबुक आरबीएसके वैद्यकिय अधिकारी व वैद्यकिय अधिक्षक यांच्या सहीने प्रमाणित करुन सादर करावे. लॉगबुक सादर न केल्यास देयके पारित करता येणार नाही. परिपूर्ण लॉग बुक सादर करण्याची जबाबदारी वाहन धारकाची राहील.

२०) तसेच लॉग बुक झेरॉक्स प्रतिमहा या कार्यालयास सादर करण्याची जबाबदारी आरबीएसके वैद्यकिय अधिकारी यांची राहील.

२१) कोणतेही कारण न देता वाहनासाठी केलेला करार केव्हाही संपुष्टात आणण्याचा अधिकार वैद्यकिय अधिक्षक यांनी राखून ठेवलेला आहे.

| अ. क्र. | वाहनाचा सविस्तर तपशील | रक्कम प्रति महिना प्रति वाहन | प्रति पथक १ वाहन प्रमाणे वाहन संख्या |
|---|---|---|---|
| १. | सेडन- इंडिगो, स्विफट डिझायर, होंडा अमेझ (४+१ आसन क्षमता) T-Permit इंजिन कॅपॅसिटी १००० सीसी | जास्तीत जास्त रु. ३१२३८/-जीएसटी करासह | २ |

दरपत्रके सील बंद लखोटयात दिनांक २४.०६.२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत (सुट्टीचे दिवस सोडून) ग्रामीण रुग्णालय गुहागर येथे वैद्यकिय अधिक्षक यांचे कार्यालयीन टपालात आणून द्यावयाचे आहेत.

वैद्यकिय अधिक्षक, वर्ग १
ग्रामीण रुग्णालय गुहागर

MEDICAL SUPERINTENDENT Cl-1
RURAL HOSPITAL GUHAGAR
Dist - Ratnagiri